MHCO090002312026

**कोल्हापूर येथील मे.न्यायाधीश, सहकार न्यायालय क्र.१, कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्रीमती ई. अ. भास्कर, न्यायाधीश)**

सी.सी.के.नं.२१५/२०२६

**कै. गोंविद राऊ चौगुले सहकारी दुध व्याव. संस्था मर्या व इतर ३.** ... वादी
**विरुध्द**
**कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर (गोकूळ)** ... प्रतिवादी

---

**निशाणी ५ खालील आदेश**

१. वादीने सदरचा अर्ज म.स.का कलम ९५ अन्वये दाव्याचे अंतिम निकालापावेतो प्रतिवादी संघाच्या दि. १०/०७/२०२६ रोजीच्या प्रशासकीय मंडळ सभेतील ठराव क्र. ४ ड ची अंमलबजावणी व पुढील कोणतीही कार्यवाही करु नये म्हणून प्रतिवादी अगर तर्फे इसमांना तुर्तातुर्त व कायम मनाईची ताकीद मिळण्याकरिता केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, वादी संस्था या महाराष्ट्र सहकारी कायदयान्वये नोंद झालेल्या प्राथमिक सहकारी दूध उत्पादक संस्था असून उत्पादक सभासदांनी उत्पादित केलेल्या दुधाचे संकलन करुन त्यांच्या विक्रीची व्यवस्था करणे, दुधाला चांगला भाव मिळवून देणे, दूध उत्पादन वाढीसाठी सभासदांना सोयी-सुविधा पुरवणे इ. त्यांचे प्रमुख उद्देश आहेत. प्रतिवादी क्र. १ संस्था ही महाराष्ट्र सहकारी कायदयान्वये नोंद झालेला जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ असून त्यांचा मुख्य उद्देश प्राथमिक सहकारी दूध संघाकडून दूध खरेदी करणे, दूध उत्पादकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तसेच दूध व्यवसाय वाढीच्या दृष्टीने पुरक अशा योजना कार्यालयाकडे करणे इ. आहे. वादी संस्था या प्रतिवादी संघाच्या सभासद असून प्रतिवादी संघ वादी संस्थेची संघीय संस्था आहेत.

३. वादीचे पुढे कथन की, वादी संस्था प्रतिवादी संघाच्या कार्यक्षेत्रामध्ये नोंदणी झालेल्या प्राथमिक सहकारी दुध उत्पादक संस्था असून त्यांनी प्रतिवादी संघाकडे दुध पुरवठा सुरु करुन सभासदत्व मागणी केली होती. वादी संस्थाच्या मागणीचा विचार करुन प्रतिवादी संघाचे संचालक मंडळाचे सभेमध्ये ठराव करुन वादीसह इतर संस्थांना सभासद करुन घेतले आहे. परंतू गेली ५ वर्षांतील संचालक मंडळाचे विरुध्द सुरु असलेल्या तक्रारीवरुन वादीसह इतर संस्थांचे विरुध्द खोटया तक्रारी करुन वादीसह इतर संस्थांचे सभासदत्व रद्द करणेचा प्रयत्न सुरु आहे. प्रतिवादी संघाची पंचवार्षिक निवडणूक विहित कालावधीत पूर्ण होणेकरिता आवश्यक प्रक्रिया प्रतिवादी संघाने पार पाडली होती. त्यास ना. उच्च न्यायालयातील याचिकेची काम झालेल्या आदेशामुळे संघाची निवडणूक प्रक्रिया सुरु झाली नाही. प्रतिवादी संघावर प्रशासक नियुक्ती करण्याच्या हेतूने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३-अअअ मध्ये दुरुस्ती करुन बेकायदेशीरपणे प्रतिवादी संघावर प्रशासक मंडळाची नियुक्ती केली असून त्याचा गैरफायदा घेऊन मा. विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांचे कडील वादीसह एकूण ४१० संस्थांना बेकायदेशीरपणे अपात्र ठरवून सदर एकूण ४१० संस्थांचे सभासदत्वाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(१) अन्वये दि. २९/०६/२०२६ रोजी वादीसह इतर एकूण ४१० संस्थांचे सभासद रद्द करणेबाबत संघाचे स्तरावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

४. वादीचे पुढे कथन की, सदर निर्देशाविरुध्द वादीसह इतर संस्थांनी उच्च न्यायालय, मुंबई सर्किट बेंच, कोल्हापूर येथे याचिका क्र. २८८१/२०२६ दाखल करुन आव्हान दिले होते. त्यामध्ये शासनाने वादी संस्था सह इतर संस्थांचे सभासदत्व रद्द केले नसल्याचे उच्च न्यायालयात कथन केले प्रमाणे ना. उच्च न्यायालयांनी सदर कथनांचे आधारे दि. ०२/०७/२०२६ रोजी आदेश केले आहेत. परंतू प्रतिवादी संघावर नियुक्त प्रशासक मंडळ वादीसह इतर ४१० संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याचे असल्याने राजकीय हेतूने प्रेरित होऊन प्रतिवादी संघाचे प्रशासक मंडळाने दि. १०/०७/२०२६

रोजीच्या प्रशासक मंडळ सभेतील ठराव क्र. ४ ड केला असून त्याव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २५ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे ठरवले असून वादी संस्थांना दि. १३/०७/२०२६ रोजी नोटीस देऊन दि. २२/०७/२०२६ पर्यंत खुलासा / लेखी म्हणणे सादर करणेस कळवले आहे. दि. १०/०७/२०२६ रोजीच्या ठरावानुसार वादीसह एकूण ४१० संस्थांनी प्रतिवादी संघाकडे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात १, ३२,३५,१७२.३० लीटर, सन २०२४-२५ चा आर्थिक वर्षात १,४९,९१,६५१.३० लीटर, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात १,५८,०१,०१९.३० लीटर असा एकूण ४,४०,२७,८४२.९० लीटर इतका दुध पुरवठा केला असून त्यानंतरही दुध पुरवठा सुरु आहे. त्याचा विचार न करता प्रतिवादी संघाच्या प्रशासक मंडळाने दि. १०/०७/२०२६ रोजी ठराव क्र. ४ड केला आहे.

५. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी संघावर दि. ०४/०५/२०२६ रोजीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ अन्वये दि. ०४/०५/२०२६ रोजीचे आदेशानुसार प्रशासक मंडळाची नियुक्ती झाली आहे. प्रशासक मंडळाला संघाचे व्यवस्थापनातील धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. संघाच्या उपविधीतील तरतुदीचा भंग झाला या बेकायदेशीर कारणावरुन कारवाई करणेचा, सभासद रद्द करण्याचा अधिकार प्रशासक मंडळाला नाही. कलम ७७-अ अन्वये प्रशासक मंडळाची नियुक्ती झाली असलेस लोकशाही पध्दतीने संचालक मंडळाची निवडणूक होऊन संचालक मंडळाच्या ताब्यात कारभार सोपवणे गरजेचे असून त्याप्रमाणे कोणतीही कारवाई न करता प्रशासक मंडळ अनाधिकाराने वादीसह ४१० संस्थाचे सभासदत्व रद्द करण्याच्या प्रयत्नास लागले आहे. त्याप्रमाणे वादीसह ४१० संस्थांचे प्रतिवादी संघाचे निवडणुकीतील सहभागी होण्याचे, मतदान करण्याचे व इतर अधिकार राजकीय हेतूने प्रेरित होऊन हिरावून घेण्याचा मुख्य हेतू आहे. प्रशासक मंडळाला सभासदत्व रद्द करण्याची व त्यासारखे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नसल्याने प्रतिवादी संघाच्या प्रशासक मंडळांनी दि. १०/०७/२०२६ रोजीच्या प्रशासक मंडळ ठराव

क्र. ४ ड हा ठरावाप्रमाणे वादीसह इतर संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याच्या हेतूने बेकायदेशीरपणे वादीसह इतर संस्थांना नोटीस देऊन दि. २२/०७/२०२६ पर्यंत लेखी खुलासा/म्हणणे देणेबाबत कळवले आहे. प्रशासकीय मंडळ वादीसह इतर एकूण ४१० संस्थांचे सभासदत्व बेकायदेशीरपणे रद्द करण्याचे ठरवून बेकायदेशीर कारवाई करत आहेत त्यामुळे प्रतिवादी संघाच्या बेकायदेशीर कृत्यांना पाचबंद होणे गरजेचे आहे. त्याकरिता वादी संस्थांनी तुर्तातुर्त मनाई ताकीद मागितली आहे.

६. प्रतिवादी यांनी निशाणी १९ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल करुन तुर्तातुर्त मनाई अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वादीला दावा दाखल करण्याकरिता कोणतेही कारण घडलेले नाही त्यामुळे सदरचा दावा चालण्यास पात्र नाही. जोपर्यंत प्रतिवादी वादीविरुध्द कोणतेही आदेश पारित करत नाही त्यामुळे वादींना सदरचा दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडले नाही. प्रतिवादी संघाचे संचालक मंडळ सन २०२५ मध्ये संपला आहे. त्यानंतर मा. विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ अ आणि ७३(अअअ) ३ अन्वये प्रशासक मंडळाची नियुक्ती केली आहे.

७. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, प्रतिवादी महासंघाच्या पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने ४२७ दुध उत्पादक संस्थांना अवैध सभासदत्व दिल्याप्रकरणी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने २ सदस्य समिती नियुक्ती केली होती, त्या समितीने अहवाल सादर केला. त्यामध्ये ६ संस्थांना त्यांच्या नोंदणीपुर्वी सभासदत्व व ४०४ संस्थांना दि. ०४/०१/२०१० रोजीच्या शासन निर्णयाचे उल्लंघन करुन सभासदत्व देण्यात आले होते. सदर अहवालाच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी म.स.का. कलम ७९(१) अंतर्गत अनुसूची अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या संस्थांचे सभासदत्व रद्द करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दि. २९/०६/२०२६ रोजी देण्यात आले.

८. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, काही संस्थांनी सदरच्या निर्देश मा. उच्च न्यायालय, सर्किट बेंच, कोल्हापूर यांच्याकडे २८८१/२०२६ ने आव्हानीत केले. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने याचिकाकर्ता संस्थांचे सदस्यत्व अदयाप रद्द किंवा समाप्त करण्यात आलेले नाही आणि हा निर्देश सदस्यत्व रद्द किंवा समाप्त करण्यासंबंधी नाही. सदरचे निवेदन प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी केले ते प्रतिवादी क्र. ६ ने मान्य केले. मा. उच्च न्यायालयाने प्रतिवादींच्या सर्व वक्तव्य नोंदवले. मा. उच्च न्यायालयाने पुढे असे मत व्यक्त केले की, योग्य कार्यपध्दतीचे पालन केले जाईल आणि गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेतला जाईल.

९. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांच्या निर्देशानुसार व मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशानुसार प्रतिवादी संस्थेने दि. १०/०६/२०२६ रोजी ठराव पारित केला. त्यानंतर प्रतिवादींनी दि. १३/०७/२०२६ रोजी ४१० सदस्यांकडून त्यांचे म्हणणे दि. २२/०७/२०२६ सायंकाळी ६ वाजेपर्यंत मागितले होते. सदर नोटीसीचे उत्तर अदयापही देण्यात आले नाही मात्र प्रतिवादी संस्थेने पारित केलेला ठराव या न्यायालयात आव्हानीत करण्यात आला आहे.

१०. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, प्रतिवादी संघाने ४१० संस्थांना नोटीस पाठवली त्यापैकी ४ संस्था या न्यायालयात त्यास आव्हान देण्याकरिता आल्या त्यामुळे सदरची संपूर्ण प्रक्रिया काही संस्थांच्या सांगण्यावरुन थांबवता येणार नाही. सदरचा दाव्यास आवश्यक पक्षकांर दाव्यात सामिल न केल्याने बाधा येत आहे. त्यामुळे सदरचा दावा चालण्यास पात्र नाही.

११. प्रतिवादींचे पुढे म्हणणे आहे की, वादींच्या अंतरिम अर्जातील परिच्छेद क्र. १ मधील कथन मान्य केले की, वादी व प्रतिवादी हे म.स.का. कायदयाअंतर्गत नोंद झालेल्या संस्था आहेत. त्यांनी पुढे मान्य केले की, वादी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात नोंद झालेली संस्था आहे. प्रतिवादी संघाने वादींना सभासदत्व बहाल केले. वादींनी त्यांना बहाल केलेल्या सभासदत्वाबद्दल मोघम कथन केले आहे.

त्यांनी पुढे मान्य केले की, म.स.का. कलम ७३(अअअ) आणि ७२(अ) अन्वये प्रशासक मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. परंतू त्यांनी सदरचा आदेश अनधिकृत असल्याबाबत नाकारले आहे. त्यांनी मान्य केले की, वादी व इतर संस्था मा. उच्च न्यायालय, सर्किट बेंच, कोल्हापूर यांच्याकडे रिट क्र. २८८१/२०२६ ने दाखल केला आहे व ते दि. ०२/०७/२०२६ रोजी निकाली काढण्यात आला आहे. प्रशासकीय मंडळाने कोणत्याही राजकीय हेतूने ४१० संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याच्या उद्देशाने दि. १०/०७/२०२६ रोजी ठराव क्र. ४-ड पारित केल्याची बाब नाकारली आहे.

१२. त्यांनी पुढे असे म्हणणे मांडले की, दुध पुरवठा करणे व सभासदत्व बहाल करणे या दोन्ही बाबी भिन्न असून एकाच वेळी दोन्ही आव्हानीत करता येत नाही. निव्वळ दुध पुरवठा करतो याचा संदर्भ देऊन प्रतिवादीच्या उपविधीचा भंग करून बेकायदेशीर सभासदत्व देता येत नाही. प्रशासक मंडळाला धोरणात्मक निर्णय घेता येत नाही ही बाब प्रतिवादीने नाकारलेली आहे. तसेच प्रशासक मंडळाला उपविधीचा भंग झाला म्हणून सभासदत्व रद्द करण्याचे अधिकार नाही ही बाब नाकारली आहे. सबब वादींचा अंतरिम अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१३. अंतरिम मनाई अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझ्या विचाराधिन उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष व समर्थनार्थ कारणे खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादी शाबीत करतो काय, नमुद केले प्रमाणे प्रथमदर्शनी खटला वादीच्या बाजुने आहे ? | **...होकारार्थी..** |
| २ | वादी शाबीत करतो काय, न्यायाचा तराजु त्याच्या बाजुने झुकला आहे ? | **...होकारार्थी..** |
| ३ | वादी शाबीत करतो काय, मागणी प्रमाणे अंतरिम मनाई आदेश पारित न झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे ? | **...होकारार्थी..** |
| ४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

<u>कारणमिमांसा</u>

१४. वादीने त्यांची बाजू शाबित करण्याकरिता निशाणी ३ सोबत वादी क्र. १ ते ४ संस्थांचे नोंदणी प्रमाणपत्र, सहायक निबंधक, सहकारी संस्था दुग्ध, कोल्हापूर यांनी प्रतिवादी संघास वादी क्र. १ ते ४ चे दुध संकलनास दिलेल्या परवानगीचे पत्र, वादी क्र. १ ते ४ यांचा ठराव, विभागीय उपनिबंधक, दुग्ध पुणे विभाग, पुणे यांचे कलम ७७अ अन्वये आदेश, विभागीय उपनिबंधक दुग्ध, पुणे विभाग, पुणे यांचे कलम ७९ (१) अन्वये निर्देश, मा. उच्च न्यायालय सर्किट बेंच, कोल्हापूर यांचेकडील आदेश, प्रतिवादी संघाचा ठराव, वादी क्र. १ ते ४ यांना प्रतिवादीने दिलेली नोटीस, वादीसह इतर ४१० संस्थांनी प्रतिवादी संघाकडे गेल्या ३ आर्थिक वर्षात दुध पुरवठा केल्याबाबतची माहिती दर्शवणारा तक्ता, सहा. निबंधक, सहकारी संस्था, दुग्ध कोल्हापूर यांनी प्रतिवादी संघाला दिलेले पत्र, प्रतिवादी संघाने सहायक निबंधक सहकारी संस्था दुग्ध, कोल्हापूर यांना दिलेले उत्तर इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

१५. प्रतिवादी संघाने त्यांची बाजू शाबित करण्याकरिता निशाणी २० सोबत कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या कोल्हापूर (गोकुळ) या संघाच्या संदर्भात प्राप्त तक्रारीची चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबतचे पत्र व चौकशी अहवाल इ. कागदपत्र दाखल केले आहे.

१६. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता-**

१७. मुद्दा क्र. १ ते ३ एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचण एकत्र केले आहे. वादातीत मुद्दे विचारात घेण्यापुर्वी दोन्ही पक्षांना मान्य असलेल्या बाबी विचारात घेणे आवश्यक ठरते त्या पुढीलप्रमाणे : -

अ. वादी व प्रतिवादी या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार नोंद झालेल्या संस्था / संघ आहेत.

ब. वादी संस्था या प्रतिवादी संघाच्या सभासद आहेत.

क. वादी संस्था या प्रतिवादी संघाच्या कार्यक्षेत्रामध्ये नोंद झालेल्या प्राथमिक सहकारी दुध उत्पादक संस्था आहेत.

ड. प्रतिवादी संघावर प्रशासक मंडळ नियुक्त आहे.

१८. वादीच्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी संघ होणाऱ्या निवडणुकीमध्ये वादीच्या निवडणुकीतील सहभागी होण्याचे, मतदान करण्याचे व इतर अधिकार राजकीय हेतूने प्रेरित होऊन हिरावून घेण्याच्या हेतूने प्रशासक मंडळाने त्यांना प्रतिवादी संघाचे व्यवसथापनातील धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नसतांना, प्रशासक मंडळाने वादी संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याच्या हेतूने प्रतिवादी संघाचे दि. १०/०७/२०२६ रोजी प्रशासक मंडळ सभेतील ठराव क्र. ४ ड पारित केला असून सदर ठरावाव्दारे म.स.का. कलम २५ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्याचे ठरवले असून वादी संस्थांना दि. १३/०७/२०२६ रोजी नोटीस देऊन दि. २२/०७/२०२६ पर्यंत खुलासा देण्याबाबत कळवले आहे. त्यामुळे वादी यांनी दाव्याचे अंतिम निकालापावेतो प्रतिवादी संघाच्या दि. १०/०७/२०२६ रोजीच्या प्रशासकीय मंडळ सभेतील ठराव क्र. ४ ड ची अंमलबजावणी व पुढील कोणतीही कार्यवाही करु नये म्हणून प्रतिवादी अगर तर्फे इसमांना तुर्तातुर्त व कायम मनाईची ताकीद मिळण्याकरिता विनंती केली आहे.

१९. याउलट प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी अन्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ, ब व क मध्ये प्राथमिक सहकारी दुध व्यावसायिक संस्थांचे सभासदत्व रद्द करणेबाबत संघाचे स्तरावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्रतिवादींनी दि. १०/०७/२०२६ रोजी ठराव क्र. ४ ड पारित केला व वादींचे म्हणणे / खुलासा मागवला. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, सदरचे प्रशासक मंडळाचे कार्य हे प्रतिवादी संघाचे

दैनंदिन कामकाजात येते. सदरची बाब ही धोरणात्मक निर्णय म्हणता येणार नाही. त्यामुळे त्यांनी वादींचा अंतरिम अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

२०. दोन्ही पक्षांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने विचार करता निशाणी ३/१३ वरील विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी दि. ०४/०५/२०२६ रोजी खालील आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी संघाचे संचालक मंडळाचा कालावधी संपुष्टात आल्याने व त्यांची पदे पुढे चालू राहू शकत नसल्याचे संघाचे व्यवस्थापनात निर्माण झालेली पोकळी दूर करण्याकरिता सदर संघावर दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्राधिकारी अधिकारी मंडळ (प्रशासक मंडळ) नियुक्त करण्यात आले.

२१. तसेच सदर कामी हे पाहणे आवश्यक ठरते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी प्रमाणे संस्थेमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला देण्यात आला आहे.

२२. सदर कामी प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी पारित केलेला ठराव हा संघाच्या दैनंदिन कामकाजाचा भाग आहे. परंतू त्याचवेळी त्यांनी निशाणी १९ वरील दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादींनी प्रशासक मंडळाला धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत ही बाब नाकारलेली आहे. तसेच प्रशासक मंडळाला सभासदत्व रद्द करणेबाबत कारवाई करता येत नाही ही बाब नाकारलेली आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दि. १०/०७/२०२६ रोजीचा ठराव बेकायदेशीर नाही. सदर बाबींचा विचार करता प्रतिवादी एका वेळेस ते दैनंदिन काम करत आहेत असा बचाव घेताना दिसत आहेत व दुसऱ्या वेळेस त्यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचा व सभासदत्व रद्द करण्याच्या कारवाईचा अधिकार असल्यामुळे पारित केलेला ठराव योग्य आहे असा बचाव घेतला आहे.

२३. प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी दिलेला निर्देश वादी संस्था व इतर यांनी मा. उच्च न्यायालय यांच्याकडे आव्हानीत केला व तेथे तो निकाली काढण्यात आला. त्यामुळे सदर निर्देशावर आधारित राहून प्रतिवादी संघाने पारित केलेला ठराव वादींना आव्हानीत करता येणार नाही. याउलट वादी यांच्या युक्तीवाद केला की, मा. उच्च न्यायालय यांच्याकडे व या न्यायालयास वाद विषय भिन्न आहे व त्यांनी सदरचा दावा त्यांना म.स.का. कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये आव्हानीत करत आहेत. सदरच्या दोन्ही पक्षांच्या युक्तीवादा अन्वये निशाणी ३/१५ वरील मा. उच्च न्यायालय यांचा रिट क्र. २८८१/२०२६ मधील अंतिम आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मा. उच्च न्यायालयामध्ये मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यांनी म.स.का. कलम ७९(१) अन्वये दिलेल्या निर्देशाला आव्हानीत करण्याकरिता सदरची रिट दाखल करण्यात आली. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने आव्हान केलेल्या विषयाच्या गुणदोषावर त्यांचे मत न नोंदवता पुढील निर्णय हे नैसर्गिक न्यायाचे पालन करुन घ्यावे असे आदेशित केले. त्याचवेळी आपल्या समोरील दाव्याचे अवलोकन केले असता सदर कामी प्रशासक मंडळाने पारित केलेले ठराव या कामी आव्हानीत करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

२४. आता आपल्या समोर प्रश्न आहे की, प्रशासक मंडळाला धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आहे का ? त्याचे उत्तर निशाणी ३/१३ मधील आदेशाचे अवलोकन केले असता कळते. सदर आदेशाप्रमाणे प्रशासक मंडळ हे प्रतिवादी संघाच्या दैनंदिन कामकाज करण्याकरिता नियुक्त करण्यात आले आहे. याउपर ***एस. एम. कांबळे व इतर विरुध्द विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई व इतर, (२००७(६) एम.एच.एल.जे. ८९०,*** या न्यायनिर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, प्रशासकाला संस्थेची रचना व भांडवलाबाबत धोरणात्मक निर्णय घेता येऊ शकत नाही. मा. उच्च न्यायालयाचे सदरचे मार्गदर्शन व आपल्या समोरील तथ्यांचा विचार करता

निशाणी ३/१६ वरील ठरावाचे अवलोकन केले असता सदर ठरावाने वादी संस्थेच्या सभासदत्व रद्द करणेबाबत यथोचित निर्णय घेण्याकरिता वादींचा खुलासा मागवलेला दिसून येत आहे.

२५. सदर ठरावावरुन आपल्याला असे लक्षात येते की, वादीच्या सभासदत्व रद्द करण्याकरिता चौकशी करण्याचे प्रशासक मंडळ कारवाई करत आहे. हे पाहणे आवश्यक ठरते की, एखादया सभासदाचे सभासदत्व बाबत ठरवणे म्हणजेच संस्थेच्या रचनेमध्ये बदल करण्यासारखे होईल. त्यामुळे सदर ठरावाने प्रशासक मंडळ धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे.

२६. प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांनी कोणाचेही सभासदत्व रद्द केलेले नाही. या युक्तीवादाच्या अनुषंगाने निशाणी ३/१३ वरील ठरावाचे अवलोकन केले असता प्रशासक मंडळाने त्यांचे यथोचित निर्णय घेण्याबाबत ठरावामध्ये ठरल्याचे नमूद आहे. यावरुन ते वादी क्र. १ ते ४ संस्थेच्या सभासदत्वाबाबत निर्णय घेणार हे निश्चित होते. तसेच वर चर्चिलेप्रमाणे सदरची बाब धोरणात्मक निर्णय होय व मा. उच्च न्यायालयाच्या दिलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे प्रशासकाला धोरणात्मक निर्णय घेता येत नाही.

२७. याउपर निशाणी ३/१७ वरील नोटीस वरुन असे लक्षात येते की, वादींना सदर नोटीस दि. १३/०७/२०२६ रोजी प्रशासक मंडळाव्दारे जारी करण्यात आली व दि. २२/०७/२०२६ पर्यंत खुलासा मागवला आहे. सदर बाबींचा विचार जर का संघाच्या पोटनियमामधील तरतुदी अन्वये विचार केला तर असे दिसून येते की, प्रतिवादी संघाच्या पोटनियम क्र. ७ (८) अन्वये संचालक मंडळ सभासदांना काढून टाकण्यापुर्वी ३० दिवसांची नोटीस देईल व त्यांचे म्हणणे ऐकून घेईल अशी तरतूद आहे. सदर बाबीचा जर विचार केला तर प्रतिवादीने वादी संस्थांना ३० दिवसांची नोटीस दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तावित कार्यवाही व्दारे जरी सभासदत्व कमी करण्याचा निर्णय ही

उपविधीच्या अधिन राहून घेणे बंधनकारक असून, प्रशासक मंडळ ही कोणतीही कार्यवाही प्रतिवादी संघाच्या विधी व उपविधीनुसार घेणे बंधनकारक आहे.

२८. क्षणापुरता नोटीस मध्ये केलेल्या दुधाबाबतचा मुद्दा विचारात घेतला तरी निव्वळ प्रशासक मंडळ यांच्या नुसार तातडीने ७ ते ८ दिवसांची नोटीस देऊन सभासदत्व कमी करता येणार नाही. दुध पुरवठयाचे उल्लंघन केले ही बाब अभिलेखावर पुरावा आल्याखेरील शाबित होणार नाही त्यामुळे निव्वळ प्रथमदर्शनी प्रशासक मंडळाने मंजूर केलेल्या ठरावावरुन सभासदत्वाबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही.

२९. याउपर हे पाहणे आवश्यक ठरते की, ***श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखाना विरुध्द वाडीकुरोली विविध कार्यकारी सेवा सोसायटी लि. व इतर, २०१०(५) एम.एच.एल.जे. ३७६,*** सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयाने मार्गदर्शन केले की, जरी एखादया सदस्याने उपविधीचे उल्लंघन केले असले तरी त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होत नाही, सभासदत्व रद्द अथवा हकालपट्टी करीता, प्रक्रिया पाळणे आवश्यक असते.

३०. वर नमूद केलेल्या मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन व आपल्या समोरील तथ्यांचा विचार करता असे दिसून येते की, वादी संघाचे सभासदत्व रद्द करण्याकरिता प्रतिवादी संघात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, प्रतिवादी संघाच्या विधी व उपविधी मधील दिलेल्या तरतुदी अन्वये प्रक्रिया पाळणे आवश्यक आहे.

३१. प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादींना सदरचा दावा दाखल करण्याकरिता कोणतेही कारण घडले नाही. याउलट वादी यांच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, त्यांना सदरचा दावा दाखल करण्याकरिता कारण घडले आहे व त्यामुळे त्यांनी सदरचा दावा दाखल केला. सदरच्या दोन्ही युक्तीवादाच्या अनुषंगाने विचार करता सदरचा दावा दाखल

करण्याकरिता कारण घडले किंवा नाही या बाबींवर विचार करता दोन्ही पक्षांच्या पुराव्याअंती निर्णय घेणे योग्य ठरते.

३२. वर नमुद केलेल्या चर्चेअंती प्रथमदर्शनी बाजूचा विचार करता वादातीत प्रशासक मंडळाच्या ठरावानुसार वादी क्र. १ ते ४ संस्थांच्या सभासदत्वाबाबत प्रतिवादी संघाचे विधी, उपविधी प्रमाणे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार वादीच्या सभासदत्वाबाबत तातडीने निर्णय होण्यासाठी खुलासा मागवला असल्यामुळे वादी क्र. १ ते ४ संस्थेच्या सभासदत्वाबाबत धोरणात्मक निर्णयाकडे प्रशासक मंडळाची वाटचाल असल्यामुळे प्रथमदर्शनी बाजू वादी संस्थेची असल्याचे दिसून येत आहे.

३३. अपरिमित नुकसानीचा विचार करता ठरावानुसार प्रशासक मंडळाने अंमलबजावणी केली तर वादी क्र. १ ते ४ संस्थेचे सभासदत्व रद्द होऊन त्याव्दारे सदरचा संस्थांना अपरिमित नुकसानीत जावे लागेल.

३४. वादी व प्रतिवादी या सहकारी संस्था असून वादी संस्था या त्यांच्या कार्यक्षेत्रामधील सभासदांकडून दुध संकलन करुन पुरवठा प्रतिवादी संघास करतात त्यामुळे विना प्रक्रिया तातडीने वादीचे सभासदत्व ठरावास अधिन राहून रद्द झाल्यास वादी संस्था क्र. १ ते ४ यांना दुधाचा पुरवठा करण्याबाबत समस्येला सामोरे जावे लागेल व त्याव्दारे वादी क्र. १ ते ४ संस्था व पर्यायाने सदर संस्थांना दुध पुरवठा करणारे सभासदांना (शेतकरी) अपरिमित नुकसानीस सामोरे जावे लागेल.

३५. न्यायाच्या तराजूचा विचार करता वर नमुद केलेले दोन्ही घटक हे वादी क्र. १ ते ४ यांच्या बाजूने झुकलेले असून न्यायाचा तराजू सदर वादींच्या बाजूने, प्रशासक मंडळाने धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने ठराव पारित करुन त्याव्दारे उपविधीतील नियमांचे काटेकोरपणे पालन न करता ३० दिवसांची मुदत न देता कार्यवाही करण्याचे स्पष्ट संकेत दिले असल्यामुळे न्यायाचा तराजू वादींच्या बाजूने आहे.

३६. वर नमुद केलेल्या सर्व परिस्थितीचा विचार करता वादातीत ठरावाव्दारे प्रशासक मंडळ हे वादी संस्था क्र. १ ते ४ यांच्या बाबत धोरणात्मक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत असून त्याव्दारे वादी क्र. १ ते ४ यांचे सभासदत्व प्रतिवादी संघाच्या विधी व उपविधीस अधिन न राहता धोक्यात येत आहे. त्यामुळे वादी संस्था क्र. १ ते ४ नमूद करतात त्याप्रमाणे त्यांना तात्पुरते संरक्षण देणे उचित ठरणार आहे. म्हणून वादींचे विद्वान वकील यांनी केलेला तोंडी युक्तीवाद स्वीकाराहं असल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ करिता निष्कर्ष होकारार्थी उत्तर नोंदवून मुद्दा क्र. ४ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी संघाच्या प्रशासकीय मंडळ सभेतील दि. १०/०७/२०२६ रोजीच्या ठराव क्र. ४ ड ची अंमलबजावणी व कार्यवाही, वादी क्र. १ ते ४ विरुध्द दाव्याचे अंतिम निकालापर्यंत अथवा या न्यायालयाचे पुढील आदेशापर्यंत करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी संघ, प्रशासकीय मंडळ अथवा त्यांच्यातर्फे इसमांना देण्यात येत आहे.

२. अंतरिम अर्जाचा खर्च आपआपला सोसणेचा आहे.

३. याप्रामणे अंतरिम अर्ज निकाली करण्यात येत आहे.

ठिकाणी – कोल्हापूर
दिनांक – २७/०७/२०२६

सही/–
( श्रीमती ई. अ. भास्कर )
न्यायाधीश
सहकार न्यायालय क्र.१, कोल्हापूर